# वार्ता टिपण तारीख ०९/०४/२०१९

## खंडणीचे गुन्हयात सुमारे दोन वर्षांपासून फरार असलेला आरोपीस खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक, पश्चिम, गुन्हे शाखा पुणे यांचेकडून अटक

लोकसभा निवडणूक २०१९ चे अनुषंगाने हडपसर परिसरात पोलीस अभिलेखावरील गुन्हेगारांना खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री.रघुनाथ जाधव व त्यांचा स्टाफ हे दिनांक ०८/०४/२०१९ रोजी चेक करीत असताना, पोलीस हवालदार पांडुरंग वांजळे यांना मिळालेल्या बातमीवरुन, हडपसर गाडीतळ येथे पोलीस अभिलेखावरील अटटल गुन्हेगार नामे योगेश सुभाष मिसाळ वय-२६ वर्ष रा.दत्त कॉलनी, काळे पडळ, हडपसर पुणे मुळगाव-मुं.पो.निमगाव केतकी, ता.इंदापूर, जि.पुणे यास पकडले असून, सदरचा आरोपी हा पुणे ग्रामीणचे हददीतील इंदापूर पो.स्टे.गुन्हा रजि.नं.१०३६/२०१८ भा.द.वि.कलम ३६४(अ),३८४,३२७,३२४,४५२,५०६,३२३,३४ व दौंड पो.स्टे.गुन्हा रजि.नं.१०४/२०१९ भा.द.वि.कलम ३८४,३८७,१७२,१४३,१४७,५०६,३४ या गुन्हयात तो गुन्हा केल्यापासून फरार होता. सदर आरोपी विरुध्द पुणे शहर व पुणे ग्रामीण भागातील वेगवेगळया पोलीस स्टेशनला खंडणी, मारामारी, खूनाचा प्रयत्न, जबरीचोरी इत्यादी मिळून एकूण १२ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी ही पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.श्री.शिरीष सरदेशपांडे सो., सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-१ मा.श्री.समिर शेख सो., यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस उप निरीक्षक निखील पवार, पोलीस कर्मचारी पांडुरंग वांजळे, अविनाश मराठे, उदय काळभोर, हनुमंत गायकवाड, विजय गुरव, अमोल पिलाणे, सचिन कोकरे, प्रमोद मगर, मंगेश पवार, नारायण बनकर यांनी केली आहे.

# वार्ता टिपण तारीख ०९/०४/२०१९

## ४ किलो गांजा बाळगणा-यास खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक, पश्चिम, गुन्हे शाखा पुणे यांचेकडून अटक

लोकसभा निवडणूक २०१९ चे अनुषंगाने पुणे शहरात अंमली पदार्थाचे गैर व्यवहारा संदर्भात खंडणी व अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा पुणे शहरचे पोलीस निरीक्षक श्री.रघुनाथ जाधव व त्यांचा स्टाफ हे दिनांक ०८/०४/२०१९ रोजी १७/२० वा. समर्थ पोलीस स्टेशनचे हददीत गस्त घालीत असताना १२५४ भवानीपेठ, सय्यद शहाबाबा दर्गाचे समोरील रोडवर पुणे येथे आले असता, इसम नामे इसाक जैनुउद्दीन शेख वय ५० रा १३०९ जुना भवानीपेठ, चमडेगल्ली, पुणे हा स्कुटीपेप मोपेड दुचाकी गाडी नंबर MH 12/ ÉS/ 2777 हिचेवर संशयास्पद बसलेल्या अवस्थेत मिळून आला. म्हणून त्याची व नमूद गाडीची दोन पंचांसमक्ष झडती घेतली असता, गाडीच्या डिक्कीत ४ किलो ७१३ ग्रॅम वजनाचा गांजा हा वर नमूद गाडीचे किंमतीसह एकूण किंमत रुपये १,१७,०००/- सह अनाधिकाराने, बेकायदेशिररित्या जवळ बाळगला असताना मिळाला त्याबाबत त्याचे विरुध्द समर्थ पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजि.नं.१०१/२०१९ एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २०(ब) (ii) (ब) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयामध्ये वर नमूद आरोपीस दिनांक ०८/०४/२०१९ रोजी अटक केली आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस उप आयुक्त गुन्हे मा.श्री.शिरीष सरदेशपांडे सो., सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे-१ मा.श्री.समिर शेख सो., यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रघुनाथ जाधव, पोलीस उप निरीक्षक आनंद रावडे, निखील पवार, पोलीस कर्मचारी प्रदीप शिंदे, एकनाथ कंधारे, शिवानंद बोले, संतोष मते, रमेश गरुड, सुनिल चिखले, भाऊसो.कोंढरे, नारायण बनकर यांनी केली आहे.